# कोटक कॉर्पोरेट अँड ट्रॅव्हल एजंट क्रेडिट कार्ड – सर्वात महत्त्वाचे नियम व अटी (एमआयटीसी)

- क्रेडिट आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा
- शुल्क आणि आकार
- बिलासंबंधीच्या तक्रारींचे निवारण
- कुचराई/कर्जफेडीत कसूर
- कार्ड हरवणे/चोरी होणे
- बिल पेमेंट करताना तुमचा मार्गदर्शक
- ग्राहकसंपर्क केंद्र
- तक्रारनिवारण/तक्रारी/तक्रारी वरच्या पातळीवर नेणे
- कार्डहोल्डरशिप खंडित करणे/मागे घेणे
- माहिती उघड करणे

एमआयटीसीमध्ये बँकेद्वारे वेळोवेळी सुधारणा केल्या जाऊ शकतात. एमआयटीसीची अलीकडील आवृत्ती प्राप्त करण्यासाठी आणि बँकेच्या कार्डहोल्डर ॲग्रीमेंटसाठी, कृपया www.kotak.com ला भेट द्या.

## क्रेडिट आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा

क्रेडिट लिमिट म्हणजे तुम्हाला तुमच्या क्रेडिट कार्डच्या साह्याने किती खर्च करण्याचा अधिकार आहे ती अधिकतम मर्यादा. क्रेडिट आणि रोख रक्कम काढण्याची मर्यादा तुम्हाला कार्डची डिलिव्हरी देताना सांगण्यात येईल आणि ती मासिक विवरणामध्येही दिलेली असते. रोख रकमेची मर्यादा तुमच्या क्रेडिट कार्डच्या मर्यादेचाच एक उपसंच आहे. बँक ठरावीक कालावधीनंतर तुमच्या कार्डखात्याचे पुनरावलोकन करील आणि अंतर्गत निकषांवर आधारित कोणतीही पूर्वसूचना न देता तुमची क्रेडिट आणि रोख रकमेची मर्यादा कमी करू शकेल.

## सेवा/सुविधा अपवर्जन (समाविष्ट नसणे)

कृपया नोंद घ्या की, बॅलन्स ट्रान्सफर/ईएमआय ऑन कॉल/मर्चंट ईएमआय/ॲड-ऑन कार्ड/वैयक्तिक कर्जाची सुविधा कार्पोरेट क्रेडिट कार्ड आणि परचेस क्रेडिट कार्डवर उपलब्ध नाहीत.


## बिल पेमेंटसाठी तुमचा मार्गदर्शक

### तुमचे विवरण

त्या-त्या महिन्यासाठीची पेमेंट्स आणि व्यवहार दर्शविणारे मासिक विवरण बँक तुम्हाला पाठवील. येणे बाकी असलेली रक्कम ₹100 पेक्षा कमी आणि कार्डखात्यावर कोणताही व्यवहार केलेला नसेल, तर विवरण पाठवले/तयार केले जाणार नाही. तुम्ही बँकेला दिलेल्या ईमेल पत्त्यावर बँक तुम्हाला ई-स्टेटमेंट पाठवील. बँक तुमच्या कॉर्पोरेटकडे एकत्रित विवरणही पाठवील, ज्यात कॉर्पोरेटच्या कर्मचाऱ्यांना जारी करण्यात आलेल्या प्रत्येक कार्डखात्याची एकूण येणे रक्कम दर्शविलेली असेल. विवरण प्राप्त न झाल्याने कार्डधारकासोबत केलेल्या करारामधील जबाबदाऱ्या आणि दायित्वे यांवर कोणताही परिणाम होणार नाही आणि तुम्ही पेमेंटच्या देय तारखेपूर्वी किमान देय रक्कम भरण्यास जबाबदार असाल.

### पेमेंट्स

1) **स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्सच्या माध्यमातून पैसे भरा (ऑटो डेबिट)**
   कार्डधारकाचे बँकेत बचत/चालू खाते असल्यास, तो अशा खात्यातून प्रत्येक महिन्याला पैसे भरण्याच्या देय तारखेस पैसे थेट भरण्यासाठी लेखी स्थायी सूचना (स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स) देऊन त्याच्या बचत/चालू खात्यातून थेट पैसे भरू शकतो.
2) **इतर कोणत्याही बँकेत असलेल्या तुमच्या बचत खात्यातून ऑनलाईन पेमेंट्सकरिता:** तुमच्या इतर कोणत्याही बँकेतील खात्यातून तुमच्या बँकेने एनईएफटी (नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्सफर) सुविधा सक्रिय केली असेल, तर इलेक्ट्रॉनिक रूपाने नेट बँकिंगच्या माध्यमातून क्रेडिट कार्डची देय रक्कम भरता येऊ शकते.
3) **शाखेमध्ये रोख रक्कम भरणे:** कार्डधारक बँकेच्या ठरवून दिलेल्या ठिकाणांवर बँकेच्या कामकाजाच्या वेळेत रोख रक्कम भरून बिलाचे पैसे भरू शकतो.
4) **चेक किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे पैसे भरणे:** ''कोटक महिंद्रा बँक क्रेडिट कार्ड XXXX XXXX XXXX XXXX'' या नावाने चेक तयार करा किंवा पार्टनर ड्रॉप बॉक्सेसमध्ये टाका. ड्रॉप बॉक्सेसची यादी पाहण्यासाठी www.kotak.com ला भेट द्या.




क्रेडिट कार्ड पेमेंट्स, इंटर बँक मोबाईल पेमेंट सर्व्हिसेस यांसारख्या पेमेंटच्या इतर पद्धतींविषयी तपशीलवार माहिती प्राप्त करण्यासाठी व अधिक जाणण्यासाठी www.kotak.com ला भेट द्या.

## शुल्क आणि आकार:

बँकेने ठरावीक कालावधीनंतर केलेल्या पुनरावलोकनाच्या आधारावर सर्व शुल्क आणि आकार यांमध्ये बदल होऊ शकतात. शुल्क आणि आकारांमध्ये कोणतेही बदल करण्यापूर्वी बँक 30 दिवस आधी आगाऊ सूचना देईल. तुम्हाला योग्य ती माहिती देऊन बँकेला योग्य वाटेल त्यानुसार बँक नवीन शुल्क किंवा आकार लागू करण्याचा हक्क स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

**क. सुरुवातीचे शुल्क आणि वार्षिक शुल्क**

| कोटक महिंद्रा बँक कार्डचे प्रकार | सुरुवातीचे शुल्क | वार्षिक शुल्क |
|---|---|---|
| ट्रॅव्हल एजंट क्रेडिट कार्ड | शून्य | ₹999* |
| बेसिक कॉर्पोरेट क्रेडिट कार्ड | शून्य | शून्य |
| क्लासिक कॉपोरेट क्रेडिट कार्ड | शून्य | ₹1000* |
| प्रीव्ही लीग प्लॅटिनम कॉर्पोरेट क्रेडिट कार्ड | शून्य | शून्य |
| कॉर्पोरेट प्लॅटिनम क्रेडिट कार्ड | शून्य | ₹999* |
| कॉर्पोरेट वेल्थ सिग्नेचर क्रेडिट कार्ड | शून्य | शून्य |
| परचेस कार्ड | शून्य | शून्य |

**ख. आर्थिक आकार:**

| कोटक महिंद्रा बँक कार्डचे प्रकार | व्याज आकार | | एटीएममधून रोख रक्कम काढणे कॉल अ ड्राफ्ट/फंड ट्रान्सफर कॅश ॲडव्हान्स, प्रत्येकी 10,000 किंवा त्याचा काही हिस्सा. | |
|---|---|---|---|---|
| | मासिक दर | वार्षिक दर (एपीआर) | पैसे काढण्यासाठी शुल्क | वार्षिक दर (एपीआर) |
| ट्रॅव्हल एजंट क्रेडिट कार्ड | 1.49% | 17.88% | लागू नाही | लागू नाही |
| बेसिक कॉर्पोरेट क्रेडिट कार्ड | 3.30% | 39.60% | लागू नाही | लागू नाही |
| क्लासिक कॉपोरेट क्रेडिट कार्ड | 3.30% | 39.60% | लागू नाही | लागू नाही |
| प्रीव्ही लीग प्लॅटिनम कॉर्पोरेट क्रेडिट कार्ड | 3.10% | 37.20% | लागू नाही | लागू नाही |
| कॉर्पोरेट वेल्थ सिग्नेचर क्रेडिट कार्ड | 3.10% | 37.20% | लागू नाही | लागू नाही |
| कॉर्पोरेट प्लॅटिनम क्रेडिट कार्ड | 3.30% | 39.60% | लागू नाही | लागू नाही |
| परचेस कार्ड | 3.30% | 39.60% | लागू नाही | लागू नाही |

**ग. इतर आकार**

| | | |
|---|---|---|
| उशिरा पैसे भरल्याबद्दल आकार (''एलपीसी'') | मागच्या विवरणानुसार देय | एलपीसी आकार |
| | ₹ 100 - 500 | ₹ 100 |
| | ₹ 500.01 - 5000 | ₹ 500 |
| | ₹ 5000.01 - 10000 | ₹ 500 |
| | ₹ 10000+ | ₹ 700 |
| किमान देय रक्कम (''एमएडी'') | 20% | |
| मर्यादा ओलांडल्यामुळे आकार | शून्य | |
| परत केलेला चेक | ₹ 500* (लागू असलेल्या दरानुसार) | |
| परकीय व्यवहार मार्क अप | 3.50%* | |
| रेल्वे बुकिंग अधिभार (लागू असलेल्या दरानुसार)** | लागू – ट्रॅव्हल एजंट, कॉर्पोरेट बेसिक आणि कॉर्पोरेट क्लासिक | |
| | सूट दिलेले – प्रीव्ही लीग प्लॅटिनम/कोटक वेल्थ सिग्नेचर कार्ड/ कॉर्पोरेट प्लॅटिनम/परचेस कार्ड | |
| इंधन अधिभार व्यवहाराच्या रकमेवर (किमान ₹10 च्या विषयाधीन)*** (लागू असलेल्या दरानुसार) | लागू – बेसिक कॉर्पोरेट | |
| | सूट दिलेले – ट्रॅव्हल एजंट, कॉर्पोरेट क्लासिक, प्रीव्ही लीग प्लॅटिनम/ कोटक वेल्थ सिग्नेचर कॉर्पोरेट कार्ड/कॉर्पोरेट प्लॅटिनम/परचेस कार्ड | |

| | |
|---|---|
| शाखेत रोख भरणा करण्यासाठी शुल्क | ₹ 100* |
| ॲड-ऑन कार्ड शुल्क | शून्य |
| व्हिसाने निश्चित केलेली युटिलिटी बिले आणि विमा देयके यांवरील व्यवहार शुल्क^ | पाण्याचे/विजेचे/पाईप्ड गॅसचे बिल - 1.1% |
| | विमा 1.1% |
| | टपाल कार्यालय/शिक्षण/सुपरमार्केट - 0.7% |
| वेब पे सर्व्हिस शुल्क | सूट दिलेले (10 जानेवारी 2014 पासून प्रभावी) |
| कार्ड बदलून देण्यासाठी शुल्क (हरवलेले आणि खराब झालेले कार्ड) | सूट दिलेले |
| क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्टची (सिबिल) प्रत अर्जदाराला देण्यासाठीचे शुल्क | ₹50 प्रति उदाहरण |
| बिल पे (युटिलिटी पेमेंट्स) | युटिलिटी पेमेंट्सच्या 0.8% |

*सरकारी कर (सेवाकर, जीएसटी, वेळोवेळी लागू असलेले कोणतेही/सर्व कर यांसह) तुमच्या कार्डवर सर्व व्याज, शुल्क आणि अन्य आकार यांवर लागू केले जातील. **स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स (ऑटो डेबिट, एनएसीएच आणि ईसीएस). **एका कॅलेंडर वर्षात रेल्वे अधिभारामध्ये जास्तीतजास्त 500 रुपयांची सूट. ***फक्त ₹500 ते ₹3,000 च्या मूल्यांदरम्यानच्या व्यवहारांसाठी इंधन अधिभारामध्ये सूट दिली जाईल. कॅलेंडर वर्षात ₹ 3,500 ची जास्तीत जास्त इंधन अधिभार सूट

^ युटिलिटी बिल पेमेंट्सवर व्यवहार शुल्काच्या गणनेवर उदाहरण.

विवरणाची तारीख - 1 डिसेंबर
पैसे भरण्याची देय तारीख - 19 डिसेंबर

16 नोव्हेंबर रोजी ₹2000 चे विजेचे बिल भरण्याचा व्यवहार केला होता. 20 नोव्हेंबर रोजी विम्यासाठी 3000 भरले होते आणि 25 नोव्हेंबर रोजी ₹5,000 चे किराणा स्टोअरचे व 10000 चे टेलिफोन बिल भरले होते.

**या व्यवहारांवर लागू केलेले शुल्क असेल:**

| व्यवहाराची तारीख | पोस्टिंग तारीख | वर्णन | किती दिवस थांबवून ठेवले | आकारावयाचे व्यवहार शुल्क |
|---|---|---|---|---|
| 16 नोव्हेंबर | 16 नोव्हेंबर | युटिलिटी बिल पेमेंटवर व्यवहार शुल्क | 33 दिवस (16 नोव्हेंबर - 19 डिसेंबर) | (33*0.04%*2000) = ₹26.40 |
| 20 नोव्हेंबर | 20 नोव्हेंबर | युटिलिटी बिल पेमेंटवर व्यवहार शुल्क | 29 दिवस (20 नोव्हेंबर - 19 डिसेंबर) | (29*0.036%*3000) = ₹31.32 |
| टीएडी = 2000 + 24.20 + 3000 + 31.32 + 5000 + 10000 = 20057.72 | | | | |

*ज्या दिवशी व्यवहार केलेला आहे त्या दिवशी सर्व व्यवहार पूर्ण केलेले आहेत असे गृहीत धरून

**व्याजमुक्त कालावधी:**

बिलिंग सायकल तारीख सुरू झाल्यापासून व्याजमुक्त कालावधी 48 तासांपेक्षा अधिक नसेल. 5 मे 2014 पासून प्रभावी: तुमच्या कार्डवरील पेमेंटची देय तारीख विवरणाच्या तारखेनंतर 18 ते 21 दिवसांच्या दरम्यान असू शकेल (तुमच्या पेमेंटच्या नेमक्या देय तारखेसाठी कृपया तुमचे स्टेटमेंट तपासून पहा). म्हणून मोफत क्रेडिटचा कालावधी तुमच्या पेमेंटच्या देय तारखेवर अवलंबून 18-48 दिवस ते 21-51 दिवस असू शकतो.

**व्याजमुक्त कालावधीच्या गणनेसाठी स्पष्टीकरणात्मक उदाहरण:**

11 एप्रिल ते 10 मे या कालावधीच्या विवरणासाठी पेमेंटची देय तारीख 28 मे असेल. तुम्ही तुमच्या आधीच्या महिन्याची रक्कम पूर्णत: भरलेली आहे असे गृहीत धरून सवलतीचा कालावधी असा असेल:

12 एप्रिल रोजी केलेल्या खरेदीसाठी, व्याजमुक्त सवलतीचा कलावधी 12 एप्रिल ते 28 मे = 48 दिवस असा असेल आणि 2 मे रोजी केलेल्या खरेदीसाठी व्याजमुक्त कालावधी 2 मे ते 28 मे = 27 दिवस असा असेल.

परंतु, तुम्ही आधीच्या महिन्याची बाकी रक्कम देय तारखेपूर्वी पूर्ण भरलेली नसेल, तर व्याजमुक्त कालावधी मिळणार नाही.

**आर्थिक आकार (व्याजासाठीचे आकार):** तुम्ही जर आधीच्या बिलाची रक्कम देय तारखेस किंवा त्यापूर्वी पूर्णत: भरली नाही, तर तुमच्या दैनंदिन आधारावर व्याजात भर पडत जाऊन ते आकारले जाईल; व्यवहाराच्या तारखेपासून ते तो व्यवहार पूर्ण करीपर्यंत व्याज आकारले जाईल. ट्रॅव्हल एजंट क्रेडिट कार्डसाठी कॅश ॲडव्हान्सेसवरील व्याज व्यवहाराच्या तारखेपासून ते व्यवहार पूर्ण करीपर्यंत दरमहा 1.49% दराने आकारले जाईल (वार्षिक 18%). देय तारखेनंतर, पण पुढील विवरणाच्या तारखेपूर्वी जर पूर्ण पेमेंट प्राप्त झाले तरीही व्याज आकारले जाईल. तुम्ही जर काही अंशी पेमेंट करीत असलात, पण तुम्ही सध्याच्या विवरणात दाखवलेली बाकी रक्कम पेमेंटच्या देय तारखेपूर्वी पूर्णपणे भरीत असलात तर, पेमेंट पूर्ण भरण्याच्या तारखेपर्यंत येणे बाकी असलेल्या एकूण रकमेवर व्याज आकारले जाईल. अशा प्रकारे आकारलेले व्याज त्यानंतरच्या विवरणात प्रतिबिंबित होईल. उदाहरणार्थ, 20

जूनच्या विवरणातील एकूण शिल्लक रक्कम ₹5,000 असेल आणि पेमेंटची देय तारीख 8 जुलै असेल व 1 जुलै रोजी ₹5,000 पेमेंट केले असेल, तर ₹5000 वरील 10 दिवसांचे व्याज 20 जुलैच्या विवरणात दाखवले जाईल. जर युटिलिटी बिलचे किंवा विमा देयकांचे काही व्यवहार केलेले असतील, तर लागू असलेल्या व्यवहारांवरील शुल्काचा समावेशही केला जाईल.

**व्याजाच्या गणनेचे उदाहरण:** असे समजा की, तुम्ही 15 मार्च रोजी केलेल्या खरेदीपैकी ₹10,000 रक्कम बाकी आहे. 31 मार्च रोजी तयार करण्यात आलेल्या विवरणात ₹10,000 शिल्लक रक्कम दाखवली जाईल. तुम्ही 10 एप्रिल रोजी ₹4,000 चे पेमेंट केले. आणि तुम्ही 15 एप्रिल रोजी ₹2,000 ची खरेदी केली. तुम्ही तुमच्या क्रेडिट कार्डवर त्यानंतर 30 एप्रिलपर्यंत काहीही पेमेंट करीत नाही. अशा स्थितीत खालीलप्रमाणे व्याज आकारले जाईल.

**दैनंदिन व्याजदर = (1.49%)*12/365 = 0.049%**

| |
|---|
| ₹10,000 च्या बाकी रकमेवर (15 मार्च – 31 मार्च) 17 दिवसांसाठी = 10000*0.1085%*17= ₹184.45 |
| ₹10,000 च्या बाकी रकमेवर (1 एप्रिल – 9 एप्रिल) 9 दिवसांसाठी = 10000*0.1085%*17= ₹97.65 |
| ₹6,000 च्या बाकी रकमेवर (10 एप्रिल – 14 एप्रिल) 5 दिवसांसाठी = 6000*0.1085%*17= ₹14.7 |
| ₹8,000 च्या बाकी रकमेवर (15 एप्रिल – 30 एप्रिल) 16 दिवसांसाठी = 8000*0.1085%*17= ₹138.88 |
| आकारलेले एकूण व्याज = ₹453.5; एकूण बाकी रक्कम = ₹8453.5 |

वरील उदाहरणात, दिनांक 30 एप्रिल रोजी य8,453.5 एवढ्या एकूण देय रकमेसाठी विवरण तयार केले गेले. तुम्ही दिनांक 15 मे रोजी य8,453.5 एवढ्या रकमेचे पेमेंट करता आणि मे महिन्यात काहीही खरेदी करीत नाही. त्यानंतर पुढे दिनांक 31 मे रोजी तयार करण्यात आलेल्या विवरणात तुम्हाला य128.4 एवढे व्याज आकारले जाईल. (14 दिवसांसाठी (1 मे – 14 मे) य8,453.5 च्या शिल्लक रकमेवर = 8453.5*0.1085%*14=128.4)

वरील उदाहरणात शासकीय कर समाविष्ट नाही (वेळोवेळी लागू असलेला सेवाकर, जीएसटी, कोणतेही/सर्व लागू असलेले कर यांसह). वर दिलेले उदाहरण दरमहा 1.49% आवर्ती व्याज दरासाठी लागू असेल.

**टीप:** जर तुम्ही ₹5,000 खर्च केले आणि तुम्ही दरमहा नेमकी देय असलेल्या किमान रकमेची (''एमएडी'') परतफेड केली आणि त्यानंतर परिणामस्वरूपी 5 वर्षांपर्यंत लांबलेली परतफेड बाकी असलेल्या रकमेवरील व्याजासह भरावी लागू शकते. म्हणून असे सुचविले जात आहे की, जेव्हा तुमच्याकडे रक्कम उपलब्ध असेल, तेव्हा एमएडीपेक्षा बरीच मोठी रक्कम बँकेला भरावी. पेमेंट देय असलेल्या तारखेनंतर एमएडीचा भरणा झाला नाही, तर विलंब आकार लागू असेल.

**कॅश रिबेट प्रोग्रॅम:**

ट्रॅव्हल एजंट क्रेडिट कार्डधारकांसाठी कोटक बँकेच्या एकमेव विवेकाधिकाराने कॅश रिबेट प्रोग्रॅम उपलब्ध करून दिले जाईल आणि ते प्रत्येक कार्डसाठी वेगवेगळे असेल. प्रोग्रॅम आणि/किंवा कॅश रिबेटशी संबंधित माहिती (कॅश–रिबेट पोस्टिंग करण्याचा प्रकार आणि पद्धत यांवरील मर्यादा, इत्यादींसह) कार्डधारकाला कोटक महिंद्रा बँकेकडून वेळोवेळी कळविले जाईल.

**बेस कॅश रिबेटची स्वत: भर पडत जाणे:**

याआधीच कळविल्यानुसार 1 जानेवारी 2019 पासून सर्व ट्रॅव्हल एजंट कार्ड्सवर बेस कॅश–रिबेट मिळणे थांबेल.

**ट्रॅव्हल एजंट कार्ड्सवरील कॅश–रिबेटसाठी सर्वसाधारण नियम व अटी:**

लिंक केलेली सर्व क्रेडिट कार्ड खाती आणि कार्ड चांगली राखली गेली पाहिजेत, म्हणजेच ती खाती डिलिंक्वंट अकाऊंट्स असायला नकोत आणि कोटक बँकेने किंवा कार्डधारकाने ती रद्द किंवा खंडित केलेली नसावीत आणि ठरवून दिलेल्या क्रेडिटच्या मर्यादेत कॅश रिबेट पोस्टिंगच्या वेळी फसवणुकीमुळे/हरवल्यामुळे/चोरी झाल्यामुळे असे कार्ड तात्पुरत्या स्वरूपात ब्लॉक केलेले नसावे. नियमित केले जात असलेल्या कार्ड खात्यावर, पात्र कॅश–रिबेट कोटक बँकेच्या एकमेव निर्णयावर पोस्ट केली जाऊ शकते.

- कॅश रिबेट प्रोग्रॅमच्या अंतर्गत खर्चानुसार संवर्गांची निवड करणे हा पूर्णत: कोटक बँकेच्या विवेकाधिकारातील विषय आहे आणि त्यात कोणतीही सूचना न देता बदल होऊ शकतो.
- प्रचलित कॅश रिबेट ग्रीडनुसार जर कार्डधारक लागू असलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसेल, तर कॅश रिबेटसाठीची विनंती रद्द झालेली आहे असे समजण्यात येईल.
- कोटक बँक जी कॅश रिबेटची गणना करील ती अंतिम, शेवटचा निर्णय देणारी आणि कार्डधारकांवर बंधनकारक असेल आणि तिच्याविषयी कोणताही वाद घालता येणार नाही किंवा प्रश्न विचारता येणार नाहीत आणि कोटक बँकेचा निर्णय सर्व ग्राहकांवर बंधनकारक असेल.
- हा प्रोग्रॅम अहस्तांतरणीय आहे, म्हणजेच कार्डधारक कोणताही कॅश रिबेट दुसऱ्या कोणत्याही ग्राहकाला हस्तांतरित करू शकणार नाही, किंवा तो त्याच्या इतर कार्ड्सचा कॅश रिबेट एकत्र करू/जोडू शकणार नाही.
- कोणतीही पूर्व सूचना न देता हे सर्व किंवा यातील काही नियम व अटींमध्ये भर घालण्याचा, बदल करण्याचा किंवा सुधारणा करण्याचा किंवा हा एकूणच कार्यक्रम मागे घेण्याचा विशेष अधिकार कोटक बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे.
- या प्रोग्रॅमविषयी काही विवाद असल्यास त्याचा अर्थ कोटक बँकेविरुद्धचा दावा असा होणार नाही.
- अशा प्रकारच्या विवादासाठी जरी ग्राहक कोटक बँकेकडे आला, तरी ती अशा विवादाची दखल घेणार नाही.
- ह्या रिबेट प्रोग्रॅममधील कोणतीही गोष्ट ह्या नियम व अटीअंतर्गत, कोटक बँकेने तिचे कोणतेही अधिकार (व्याज आकारण्यासह) सोडून दिलेले आहेत असा होत नाही.

**ग्राहकसंपर्क केंद्र**

तुम्ही आमच्याशी जो पत्रव्यवहार कराल, त्यात कृपया तुमच्या 16 अंकी क्रेडिट कार्ड क्रमांकाचा उल्लेख करा.

तुम्ही बँकेशी खालीलपैकी कोणत्याही मार्गाने संपर्क साधू शकता.

(क) आमच्या 24 तास उपलब्ध असलेल्या सेवाकेंद्राला कॉल करून – 1860 266 2666 किंवा दूरध्वनी क्रमांकांची तपशीलवार यादी www.kotak.com वर उपलब्ध आहे. (ख) ईमेलद्वारे ु.ड्ढीरंड्ड.लो वर लॉगिंग करून किंवा इंटरनेट बँकिंग अकाऊंटच्या माध्यमातून (ग) कुरिअरच्या माध्यमातून – सेवा व्यवस्थापक (घ) नियमित पोस्ट (टपाल) : कोटक महिंद्रा बँक लि., कोटक क्रेडिट कार्ड्स पो.बॉ. क्र. 27703, मालाड (पूर्व), मुंबई – 400097, भारत.

## बिलिंगविषयीच्या विवादांचे निवारण

विवरणात दिलेले आकार जर कार्डधारकाला मान्य नसतील, तर विवरण प्राप्त झाल्यापासून 60 (साठ) दिवसांच्या आत त्याविषयी कोटक महिंद्रा बँकेच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवले पाहिजे; असे न केल्यास विवरणात दर्शविलेले सर्व आकार योग्य आणि तुम्हाला स्वीकारार्ह आहेत असे मानले जाईल. कृपया नोंद घ्या की, आंतरराष्ट्रीय व्यवहाराबद्दल जर तुमचा काही विवाद असेल, तर तुम्ही आम्हाला तुमच्या पासपोर्टची प्रत दिलीच पाहिजे. कार्डधारकाने जर क्रेडिट कार्डसाठी जास्तीचे पैसे भरले असतील, तर ते पैसे फक्त क्रेडिट कार्ड खात्यातच परत केले जातील. क्रेडिट कार्ड जर रद्द झाले, तर जास्तीची बाकी येणे असलेली कोणतीही रक्कम ग्राहकाच्या फक्त बचत खात्यात हस्तांतरित करण्यात येईल.

## तक्रारनिवारण/तक्रारी/तक्रार वरच्या पातळीवर घेऊन जाणे

असे घडण्याची शक्यता कमी आहे, पण तरीही तुम्ही जर आमच्या सेवांविषयी समाधानी नसलात, तर तुम्ही पुढीलप्रकारे तुमची तक्रार नोंदवू शकता (1) www.kotak.com वर उपलब्ध असलेला ''तक्रार अर्ज'' भरून (2) आमच्या ग्राहक संपर्क केंद्राला कॉल करून (3) सर्व्हिस मॅनेजर–सर्व्हिस ऑपरेशन्स यांना लिहून कळवून (4) त्यानंतर तक्रार वरच्या पातळीवर घेऊन जाण्यासाठी तुम्ही येथे लिहून कळवू शकता: nodalofficercards@kotak.com वर नोडल ऑफिसर, क्रेडिट कार्ड्स डिव्हिजन. तुमची तक्रार बँकेकडे प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसांच्या आत जर तिचे निवारण झाले नाही, तर अशी तक्रार बँकिंग लोकपाल कडे पाठवता येईल. तुमच्या ठिकाणासाठी असलेल्या बँकिंग लोकपालचे तपशील बँकेच्या शाखांमध्ये प्रदर्शित कलेले आहेत.

## कुचराई/परतफेडीत कसूर

कार्डधारक जर किमान कमीतकमी देय रक्कम भरू शकला नाही, तर कार्डधारकांना त्यानंतरच्या प्रत्येक विवरणात त्यांची थकीत रक्कम भरण्याविषयी ताकीद दिली जाईल. 6 महिन्यांपेक्षा अधिक काळासाठी येणे बाकी असलेली रक्कम थकीत राहिल्यास कार्डधारकाला 'विलफूल डिफॉल्टर' म्हणून संबोधण्यात येईल. परतफेडीत कुचराई झाल्यास त्याविषयीचा पाठपुरावा पोस्ट, फॅक्स आणि दूरध्वनीद्वारे केला जाऊ शकतो. बँक आणि त्यासाठी नियुक्त केलेले कोणतेही तृतीय पक्ष हे क्रेडिट कार्ड ऑपरेशन्ससाठी आणि थकीत रक्कम गोळा करण्यासाठी तसेच रिपझेशन ऑफ सेक्युरिटी पॉलिसीच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या बँकेच्या फेअर प्रॅक्टिस कोडचा अवलंब करतील. कुचराईविषयी माहिती मिळालेला कोणताही विषय मागे घेण्याचा बँकेला खालील परिस्थितीत अधिकार राहील:

- संबंधित कसूर करणाऱ्या व्यक्तीने बँकेस त्याची संपूर्ण थकबाकी रक्कम अदा केल्यास किंवा बँकेबरोबर आपल्या देय रकमेची सेटलमेंट केल्यास.
- बँकेद्वारे किंवा बँकेच्या विरुद्ध दाखल करण्यात आलेल्या कायदेशीर खटल्यात न्यायालयाकडून आदेश/निर्णय प्राप्त झालेला असेल, ज्यात कार्डधारकाचे नाव कसूर करणाऱ्यांच्या यादीतून वगळण्याच्या सूचना असतील. प्रकरणांनुसार वैयक्तिक समीक्षाद्वारे निर्णय घेतले जातात.
- वर उल्लेख केलेल्या परिस्थितीमध्ये कार्डधारकांना पुढील मासिक रिफ्रेशमध्ये क्रेडिट ब्युरोकडे 'करंट' म्हणून अद्ययावत करण्यात येईल.
- कार्डधारकाचा मृत्यू झाल्यास किंवा त्याला कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास कार्डखात्यावरील थकीत रक्कम वसूल करण्यासाठी बँक तिच्या विवेकाधिकारात कायद्याने उपलब्ध असलेल्या सर्व मार्गांचा आणि उपाययोजनांचा अवलंब करण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे, ज्यात कोणत्याही लागू असलेल्या विमा संरक्षणातून किंवा कार्डधारकाचे वारस/कार्यकारी/प्रशासक यांच्याकडून कार्डवरील थकीत रक्कम वसूल करण्याचाही समावेश आहे.

## कार्डहोल्डरशिप खंडित करणे/मागे घेणे

कार्डधारक त्याची/तिची क्रेडिट कार्ड सुविधा लेखी विनंती करून किंवा बँकेच्या ग्राहक संपर्क केंद्राला कॉल करून कोणत्याही वेळी खंडीत करू शकेल आणि कार्ड कर्णरेषेत कापून त्याचे तुकडे करू शकेल. येणे बाकी असलेली तुमची सर्व रक्कम तात्काळ देय होईल. क्रेडिट कार्ड जर 150 दिवसांपेक्षा अधिक कधीही वापरले गेले नसेल, तर सुरक्षेच्या कारणांस्तव कार्ड तात्पुरत्या स्वरूपात ब्लॉक केले जाऊ शकेल. कोटक महिंद्रा बँक कोणतीही पूर्व सूचना न देता कार्डचा वापर कोणत्याही वेळी रद्द करू शकेल, जर तिला व्यवसायासाठी किंवा सुरक्षेच्या कारणांसाठी हे रास्तपणे आवश्यक वाटल्यास, ज्यात तुम्ही पेमेंट करण्यात विलंब करणे, क्रेडिट मर्यादा ओलांडणे किंवा चेक न वटणे यांचाही समावेश आहे.

## कार्ड हरवणे/चोरी होणे

कार्ड हरवल्यास कार्डधारकाने ग्राहकसंपर्क केंद्राला तात्काळ कॉल करून बँकेला कळवावे. कार्डधारकाने विनंती केल्यानंतर त्याचा गैरवापर होऊ नये म्हणून बँक तात्काळ कार्ड निष्क्रिय करण्याचा प्रयत्न करील. कार्डधारकाने स्थानिक पोलीस ठाण्यात प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवलाच पाहिजे. जेव्हा कोणी कार्डधारकाच्या संमतीने किंवा संमतीशिवाय कार्ड प्राप्त करून कार्डचा किंवा पिनचा गैरवापर करील तेव्हा किंवा कार्डधारक अप्रामाणिक वागेल किंवा रास्त काळजी घेणार नाही, तेव्हा कार्डधारकच सर्व नुकसानाला जबाबदार असेल. कार्डधारक सरसकट निष्काळजीपणे वागलेला/ली नसेल, तर कार्ड हरविल्याबद्दल एकदा कोटक महिंद्रा बँकेला माहिती दिल्यानंतर कार्डधारक कार्डच्या कोणत्याही प्रकारच्या गैरवापरासाठी जबाबदार नसेल.

## माहिती उघड करणे

कार्डधारक हे मान्य करतो/ते की, सध्याच्या व्यवसायाच्या पद्धतीनुसार, ग्राहकाला कोणतीही पूर्वसूचना न देता कोणत्याही क्रेडिट ब्युरोला (सध्याच्या किंवा भविष्यातील) क्रेडिट कार्ड्सच्या संबंधातील कोणतीही माहिती वेळोवेळी उघड करण्याचा बँकेला अधिकार आहे. द क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो इंडिया लि. (सिबिल) आणि इतर क्रेडिट ब्युरोज हे आर्थिक प्रणालीच्या कामकाजासाठी आणि स्थैर्यासाठी असलेले भारत सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे उपक्रम आहेत. कार्डची थकीत रक्कम प्राप्त झाल्याची कोणतीही ताजी माहिती/अद्ययावत माहिती, बँकेला पेमेंट प्राप्त झाल्यापासून 60 दिवसांच्या आत सिबिल/इतर क्रेडिट ब्युरोंकडे प्रतिबिंबित होईल. आम्ही कार्डधारकांना अशीही माहिती देऊ इच्छितो की, बँक स्वत:च्या विवेकाधिकारात, तक्रारींशी संबंधित संभाषण किंवा पेमेंटच्या वसुलीसाठीचे संभाषण किंवा इतर कोणतेही संभाषण बँकेला योग्य वाटेल असे कार्डधारक आणि बँकेचे प्रतिनिधी यांच्यामधील विशिष्ट संभाषण रेकॉर्ड करू शकेल.

CORP/30/03/2020